# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्र-३३८/२०२४ दिनांक-०३/०९/२०२४.

## बांधकाम ठेकेदार यांचा खुनाचा गुन्हा उघड करण्यात गुन्हे शाखा कक्ष - ३ विरार यांना यश

दि. २४/०८/२०२४ रोजी सकाळी ०९.५० वाचे पुर्वी जोगेंद्र यादव चाळ, घरतवाडी, श्रीरामनगर, नालासोपारा पूर्व ता.वसई जि.पालघर येथे फिर्यादी नामे श्री. दिपनारायण गोविंद बिंद यांचा त्यांचा भाऊ नामे प्रमोदकुमार गोविंद बिंद याचेशी संपर्क होत नसल्याने फिर्यादी यांना प्रमोदकुमार गोविंद बिंद यांचे राहते घरी जाऊन खिडकीतुन आत पाहीले असता त्यांना प्रमोदकुमार ऊर्फ कतवारु गोविंद बिंद हा रक्ताच्या थारोळयात पडलेला दिसला त्यावेळी त्यांनी मयत याचे घराचे दरवाज्याला लावलेले कुलूप तोडून आत प्रवेश केला असता त्यांना त्यांच्या भावाचे गळ्यावर अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन धारधार शस्त्राने वार करुन त्यांचा खुन केल्याचे दिसुन आले म्हणुन पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ६६६/२०२४ भारतीय न्याय संहीता १०३ (१) प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

पोलीस उप आयुक्त गुन्हे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे यांनी सदर घटनेची गांभीर्याने दखल घेवुन गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेणे बाबत दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष ३ व्दारे करीत असतांना तांत्रीक विश्लेषण व प्राप्त गोपणीय बातमीवरुन आरोपीत नामे समिरकुमार ऊर्फ समशेर बच्चालाल बिंद, रा. ग्राम ठठरा सिसई वस्ती, कछवा चौराह,थाना मिर्झामुराद, जि. वाराणसी, राज्य उत्तरप्रदेश. यास एस.टी.एफ. वाराणसी यांचे मदतीने उत्तरप्रदेश येथुन ताब्यात घेण्यात आले असुन त्याचे कडे गुन्हे अनुषंगाने विचारपुस केली असता आरोपीत याने पैसे जबरी चोरी करण्याच्या उद्देशातुन इसम नामे प्रमोदकुमार उुर्फ कतवारु गोविंद बिद, याचा खुन केल्याचे निष्पन्न झाले आहे.

उक्त आरोपी यास पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ६६६/२०२४ भारतीय न्याय संहीता १०३ (१) या गुन्हयात हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, सपोनि/ सोपान पाटील, पोउपनिरी/ उमेश भागवत, ज्ञानेश्वर आव्हाड, सफौ/ अशोक पाटील, पोहवा/मनोज चव्हाण,सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, सुमित जाधव, मनोज तारडे, तुषार दळवी, आतिश पवार, म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण, सायबर सेल यांनी पार पाडली आहे.


गुन्हे शाखा
मिरा भाईंदर-वसई विरार पोलीस आयुक्तालय
विरार कक्ष - ३
CRIME BRANCH
VIRAR UNIT - 3

-----------ooooo----------